# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धीपत्रक

- **"ट्रायबल वॉक" च्या माध्यमातून संविधान जनजागृतीचा प्रभावी उपक्रम**
- **"घर घर संविधान" सप्ताह उत्साहात संपन्न**

भारतीय संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ अंतर्गत "घर घर संविधान" हा जनजागृतीपर उपक्रम मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, सोमवार, दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी महापालिका शाळा क्रमांक १९ माशाचा पाडा ते आदिवासी पाडा दरम्यान "ट्रायबल वॉक" चे आयोजन करण्यात आले.

या विशेष उपक्रमात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या प्रमुख उपस्थितीत, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी भागातील सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्वाची माहिती घेतली आणि संविधान मूल्यांची जाणीव अधिक खोलवर रुजवली.

यावेळी शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता, सहाय्यक आयुक्त, उद्यान अधिक्षक, महानगरपालिका अधिकारी-कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले आणि संविधानाच्या मूल्यांबाबत जनजागृती घडवून आणण्यात आली.

संपूर्ण आठवडाभर महानगरपालिके मार्फत संविधान मूल्यांची माहिती देणारे कार्यक्रम, हेरिटेज वॉक, प्रश्नमंजुषा, वारसास्थळ भेटी आणि उद्देशिकेचे वाचन आदी उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक संस्थांचा भरघोस प्रतिसाद लाभल्याने संविधानावरील जनजागृतीचा मोठा विस्तार साधता आला. "घर घर संविधान" या उपक्रमाच्या माध्यमातून लोकशाही, समता, न्याय आणि बंधुता या मूलभूत संविधान मूल्यांचा प्रसार करत असून, अशा विविध उपक्रमांद्वारे नागरिकांमध्ये संविधानप्रेम निर्माण करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कटीबद्ध आहे.